

KALEIDOSCOPE

# 30th May, 2020

## One Day International Webinar On

# Role & Challenges for Clinical Pharmacist









पुढारी

भोसले फार्मसी कॉलेजमार्फत विद्यार्थ्यांसाठी विविध ऑनलाईन व्याख्याने

सावंतवाडी : पुढारी वृत्तसेवा

सावंतवाडीतील यशवंतराव भोसले कॉलेज ऑफ फार्मसीमार्फत विविध प्रकारच्या ऑनलाईन व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते. ३० मे रोजी पहिले आंतरराष्ट्रीय ऑनलाईन व्याख्यान आयोजित करून संस्थेने विद्यार्थ्यांसाठी महत्त्वपूर्ण उपलब्धी प्राप्त करून दिली.

प्रमुख मार्गदर्शक वक्ते म्हणून डॉ. प्रवीणकुमार पाटील, क्लिनिकल फार्मासिस्ट, टेक्सास अमेरिका यांनी थेट अमेरिकेतून ऑनलाईन मार्गदर्शन केले. या व्याख्यानाला सुमारे दीड हजार पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी ऑनलाइन उपस्थिती दर्शवली. कोरोना महामारी काळात वैद्यकीय क्षेत्रात काम करणारे फार्मासिस्ट कशाप्रकारे महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतात याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. तसेच कोरोना आजाराची लक्षणे, त्याच्या संक्रमणाचे विविध टप्पे आणि वापरण्यात येणाऱ्या विविध औषध उपचार पद्धती याचीही माहिती दिली. या कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा.विनोद मुळे यांनी काम पाहिले.

२७ ते २९ मे या कालावधीत फार्मसी विषयासंबंधित इतर अनेक ऑनलाईन व्याख्याने आयोजित केली गेली. देशातील नामवंत विषयतज्ज्ञांनी त्यामध्ये सहभाग घेतला. यात हैदराबाद येथील डॉ.मल्लिका, नागपूर येथील डॉ. ठाकरे, महागाव येथील डॉ. नदाफ व पुणे येथील डॉक्टर नामदेव यांचा समावेश होता. या सर्व व्याख्यानांचे प्रक्षेपण ऑनलाईन झूम ॲप द्वारे तसेच फेसबुक लाईव्ह व युट्युबद्वारे करण्यात आले. या माध्यमांवर सुमारे तीन हजारपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शवली. या कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. दुर्गेश गौतम यांनी जबाबदारी सांभाळली. त्यांना प्रा.रश्मी महाबळ, प्रा.स्पर्शा बांदेकर आणि प्रा.संकेत गांधी यांचे सहकार्य लाभले. लॉकडाऊन काळातही कॉलेजने असे स्तुत्य शैक्षणिक उपक्रम राबविल्याने संस्थेचे कार्याध्यक्ष अच्युत सावंत-भोसले व संचालक मंडळाने कॉलेजचे प्राचार्य व शिक्षकांचे अभिनंदन केले.

सावंतवाडी येथील यशवंतराव भोसले कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये ऑनलाइन कनेक्ट झालेले विद्यार्थी.

वैभववाडी : प्रतिनिधी

हेत गावाला चक्रीवादळाचा त[...] आहे. गुरुवारी सकाळी ९.३० वा. अचानक जोरदार चक्रीवादळ झाले [...] वाहिन्यांवर झाडे उन्मळून पडल्यामुळे [...] तुटून वीज पुरवठा खंडित झाला. त्यामु[...] उन्मळून पडली आहेत. प्राथमिक शा[...] उडाल्यामुळे नुकसान झाले आहे. त[...] उडाल्यामुळे घरांचेही नुकसान झाले आ[...]

One day international webinar on “**Role & Challenges for Clinical Pharmacist**” was organized at Yashwantrao Bhonsale College of Pharmacy, Sawantwadi on 30th May, 2020. Total 1437 faculty & students were participated for this webinar from different states & countries. The expert speaker Dr. Pravinkumar R. Patil highlighted the role of pharmacist in the COvid-19 pandemic situation.

The guest of honor Hon. Shri. Achyut Sawantbhonsale, Executive Chairman given the best wishes for this webinar. Principal Dr. Vijay Jagtap sir in his introductory speech given brief idea about this webinar. Vote of thanks at the end was proposed by coordinator Mr. Vinod S. Mule.